| | |
|---|---|
| | **भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३४६/२०१३**<br>**मधील अर्ज निशाणी क्र. १४ खालील आदेश**<br>**(CNR–MHWS050001982012 )** |

१. प्रस्तुतचा अर्ज मयत अर्जदार मोहन महादू आडे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. सदरचा अर्ज वाचला. गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्यातर्फे प्रस्तुतच्या अर्जास दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.भिंगारे यांचा आणि गैरअर्जदार क्र.१ यांचेतर्फे सहा.सरकारी वकील श्री. जी.डी. गंगावणे यांचा आणि गैरअर्जदार क्र. २ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. बी.एम ठाकरे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. अर्जदार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स मयत अर्जदार मोहन महादू आडे यांनी भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. परंतू मुळ अर्जदार मोहन आडे हे दिनांक २५.११.२०१६ रोजी मयत झाले आहेत, त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब माफीचा प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर मानोरा यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५०/२०२४ मधील दिनांक २८.११.२०२४ रोजीच्या आदेशानुसार दिनांक ४.१२.२०२४ रोजी दिलेल्या वारस प्रमाणपत्रानुसार मोहन महादू आडे हे दिनांक २५.११.२०१६ रोजी मयत झाले आहे, त्यांना शांतीबाई, तुकाराम, चंगोलाबाई, संगीता आणि दिनेश असे पाच वारस आहेत. तरी, ते वारस अभिलेखावर घेण्यासाठी ७ वर्ष १० महिने १८ दिवस इतका विलंब झालेला आहे. तरी, तो विलंब माफ करण्यात यावा.

४. याउलट गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, विलंब माफ करण्यास नमुद केलेले कारण योग्य नाही. त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स मयत अर्जदार मोहन महादू आडे यांनी भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे

कलम १८ अन्वये दाखल केला आहे व मुद्दे निशाणी क्र. ११ अन्वये दिनांक १३.२.२०१७ रोजी काढलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. या परिस्थीतीत मयत अर्जदाराचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१] प्रस्तुतचा अर्ज नि.१४ हा मंजूर करण्यात येत आहे आणि मयत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ७ वर्षे १० महिने १८ दिवस विलंब माफ करण्यात येत आहे.

२] खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.10.04 13:48:30 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : ४/१०/२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C. R. Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D., Mangrulpir |
| Date of Decision | : | 4.10.2025 |
| Order signed by the P.O. on | : | 4.10.2025 |
| Order uploaded on | : | 4.10.2025 |